अमर सेवा मंडळ द्वारा संचालित

# कमला नेहरू महाविद्यालय,

सक्करदरा चौक, नागपूर–24

द्वारा आयोजित

# राष्ट्रीय सेवा योजना

# वार्षिक अहवाल

# २०१५–२०१६

अमर सेवा मंडळद्वारा संचालित कमला नेहरू महाविद्यालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत सत्र 2015–2016 मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर (राष्ट्रीय सेवा योजना) विभागाने पाठविलेल्या परिपत्रकानुसार तसेच कमला नेहरू महाविद्यालया अंतर्गत झालेल्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या कार्यक्रमाचा अहवाल सादर करीत आहोत.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सत्र 2015–16 या सत्राकरिता आमच्या महाविद्यालयाला एकुण 100 स्वयंसेवकांकरीता परवानगी मिळाली. त्यात 60 विद्यार्थी व 40 विद्यार्थिनी त्यांच्या मुलाखती घेवून व मागील 2014–2015 च्या सत्रामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे एक पूर्ण वर्ष झालेल्या विद्यार्थ्यांना सत्र 2015–2016 मध्ये प्रवेश देण्यात आला.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडून राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रवेश अर्ज भरून घेवून पालकांची समंती घेवून त्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

सत्र 2015–2016 या सत्राकरीता राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाकरीता महाविद्यालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना समितिची स्थापना करण्यात आली. व ती खालील प्रमाणे होती.

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रीय सेवा योजनेचे अध्यक्ष | :- | डॉ. अरविंद शेंडे<br>प्राचार्य, कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर. |
| कार्यक्रम अधिकारी | :- | डॉ. अशोक कांबळे |
| सदस्य | :- | प्रा. निनाद काशीकर, प्रा. देवेन्द्र मनगटे,<br>प्रा. प्रविण सोनटक्के, प्रा. पराग गावंडे,<br>प्रा. कल्पना भजनी, प्रा. मृणाल वलीवकर,<br>प्रा. डॉ. संध्या जैन, प्रा. प्रिती महाजन, |

## दिनांक 11/07/2015 जागतिक लोकसंख्या दिवस

राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत 11/07/2015 ला महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून अमर सेवा मंडळाचे सचिव, ॲड. अभिजीत वंजारी हे होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद शेंडे, NSS कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अशोक कांबळे व्यासपीठावर उपस्थित होते.

या अनुषंगाने महाविद्यालयात निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात महाविद्यालयाच्या सर्व शाखेच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भाग घेतला. निबंध स्पर्धेचा विषय **"वाढत्या लोकसंख्येचे रोजगार संधीवर होणारे परिणाम"** हा होता. प्रथम तीन विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. याप्रसंगी अमर सेवा मंडळाचे सचिव ॲड. अभिजीत वंजारी यांनी "लोकसंख्या वाढीचा भस्मासुर" या विषयावर आपले मत व्यक्त केले. केवळ सरकारने कायदा करून लोकसंख्या वाढीला आळा घालणे शक्य नसून यासाठी समाज प्रबोधन करणे आवश्यक आहे याकरिता महाविद्यालयानी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना आपले कर्तव्य समजावून प्रचार व प्रसार केला पाहिजे असे मत व्यक्त केले.



## 1 ऑगष्ट 2015 लोकमान्य टिळक पुण्यतिथी, कमला नेहरू जयंती साजरी –

दरवर्षीप्रमाणे कमला नेहरू महाविद्यालयामध्ये 1 ऑगष्ट 2015 ला लोकमान्य टिळक स्मृती दिवस व कमला नेहरू जयंती साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दि. 31 जुलै 2015 ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या समितिची व स्वयंसेवकाची बैठक सकाळी 10.15 वाजता घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्वयंसेवकांमार्फत स्वच्छता अभियान,

या कार्यक्रमाच्या अध्यक्षा आदरणीय डॉ. सुहासिनी वंजारी मॅडम यांनी दोन्ही महापुरूषांच्या कर्तृत्वावर आपले विचार मांडले. देश घडविण्यासाठी व समृध्द बनविण्यासाठी कमला नेहरू यांनी अप्रत्यक्षपणे फार महत्वाचे कार्य केले. त्याचप्रमाणे लोकमान्य टिळकांच्या कार्याचा सुध्दा उल्लेख केला.

## 1 ऑगष्ट 2015 साहित्य भुषण अण्णाभाऊ साठे यांची जयंती

साहित्य भुषण अण्णाभाऊ साठे ट्रस्ट, नागपूरच्या वतीने 2015–2016 या सत्रामध्ये होणाऱ्या सामाजिक कार्यक्रमामध्ये कमला नेहरू महाविद्यालय नागपूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा सहभाग राहील यासबंधीची माहिती देण्यात आली.

1 ऑगष्ट 2015 साहित्य भुषण अण्णाभाऊ साठे यांची 94 वी जयंती साहित्यभुषण अण्णाभाऊ साठे स्मारक ट्रस्ट, नागपूर यांच्या वतीने घेण्यात आली. या निमित्त्याने चिंचभुवन येथील ट्रस्टच्या परिसरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या जयंतीच्या निमित्त्याने कार्यक्रमाचे उद्घाटक मा. श्री. हरीषजी पायघन होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. माधवरावजी झोड, समाजकल्याण अधिकारी होते तसेच प्रमुख वक्त्यांमध्ये श्री. चंद्रकांत वानखेडे, खुशालजी खडसे, डॉ. अशोक कांबळे होते त्यांनी अण्णाभाऊ साठे यांनी केलेले कार्य, त्यांचे साहित्य व समाजाला साहित्याची असलेली गरज या बाबी त्यांच्या वक्तव्यात मांडल्या.

## दि. 6 ऑगष्ट 2015 अवयव दान जनजागृती रॅलीत सहभाग :–

रासेयो/29/2015–2016 दिनांक 1 ऑगष्ट 2015 च्या पत्रानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मातृसेवा संघ समाजकार्य संस्था व मोहन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अवयव दान जन–जागृती अभियान रॅलीचे आयोजन दिनांक 6 ऑगष्ट 2015 रोजी सकाळी 8.30 वाजता मातृसेवा संघ समाजकार्य संस्था, बजाजनगर, नागपूर येथे करण्यात आलेले होते. या कार्यक्रमाला कमला नेहरू महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अशोक कांबळे, डॉ. संध्या जैन, प्रा. निनाद काशीकर, प्रा. प्रिती महाजन या कार्यक्रमाला उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे 30 स्वयंसेवक रासेयो बॅनर व बॅचसह मातृसेवा संघ महाविद्यालयात उपस्थित होते.

या रॅलीचे उद्घाटन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. सिध्दार्थविनायक पी. काणे यांनी केले. या रॅलीमध्ये नामांकीत हॉस्पीटलचे अनेक डॉक्टर, मोहन फाऊंडेशन चे सभासद गण, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. भाऊ दायदार, श्री. वाळके व अनेक महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

त्यानंतर ही रॅली बजाजनगर, लक्ष्मीनगर, दिक्षाभुमी येथे नेण्यात आली व त्या रॅलीचा समारोप डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दिक्षाभुमी येथे करण्यात आला.



दि. 10 ऑगष्ट 2015 रक्तदान शिबीर :–

अमर सेवा मंडळाचे संस्थापक, श्रध्देय आमदार श्री. गोविंदरावजी वंजारी यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला अमर सेवा मंडळाच्या अध्यक्षा आदरणीय डॉ. सुहासिनी वंजारी, अमर सेवा मंडळाचे सचिव मा. ॲड अभिजीत वंजारी त्याचप्रमाणे आयुष ब्लड बॅंक व कम्पोनंट लॅब चे सचिव डॉ. संजय मदनकर व डॉ. राजीव मारावार उपस्थित होते. कमला नेहरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद शेंडे व उपप्राचार्य डॉ. प्रदिप दहिकर व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अशोक कांबळे उपस्थित होते.

या रक्तदान शिबीरात अमर सेवा मंडळाचे सचिव, ॲड. अभिजीत वंजारी यांनी अमर सेवा मंडळाचे संस्थापक स्व. आमदार गोविंदराव वंजारी यांच्या जयंती निमित्त आपले विचार मांडले त्याचप्रमाणे रक्तदानाचे महत्व स्पष्ट केले."दानात दान रक्तदान" या अनुषंगाने मत व्यक्त केले. डॉ. मदनकर यांनीसुध्दा रक्तदान व रक्त तपासणी याबाबत आपले मत व्यक्त केले. रक्तदान ही काळाची गरज आहे. रक्त तपासणीतुन रोगाचे निदान लागते. अशा महत्वाच्या बाबी त्यांनी सांगितल्या. या रक्तदान शिबीरामध्ये एकुण 50 विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.



दि. 15 ऑगष्ट 2015 स्वतंत्रता दिवस साजरा :–

दि. 15 ऑगष्ट 2015 स्वतंत्र्यता दिवस साजरा करण्याच्या उद्देशाने दि. 14 ऑगष्टला राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची बैठक बोलविण्यात आली. 15 ऑगष्ट 2015 ला स्वातंत्र्य दिनाचे महत्व लक्षात घेवून या बैठकीत महाविद्यालय-स्वच्छता अभियान राबविण्याचे ठरविले. दि. 14 तारखेला सकाळी 10.15 वाजता स्वंयसेवकांनी मैदानावरील गवत, कचरा उचलून पटांगण स्वच्छ करून चूना व तोरण बांधणे इत्यादी कामे स्वयंसेवकांनी केली. तसेच 15 ऑगष्टला झेंडा वंदनाची तयारी केली. 15 ऑगष्ट ला सकाळी 8.30 वाजता झेंडा वंदनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

या दिवसाचे अवचित्य साधून आदरणिय डॉ. वंजारी मॅडम यांनी ज्या ज्या थोर पुरूषांमुळे देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरीता ज्या ज्या थोर पुरूषांनी आहुती दिली त्यांचे स्मरण त्यांनी करून दिले. त्याचप्रमाणे महात्मा गांधी यांची स्वातंत्र्याची चळवळ विद्यार्थ्यांसमोर मांडून इतिहासाची आठवण करून दिली. अमर सेवा मंडळांचे सचिव, मा.ॲड. अभिजीत वंजारी यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसमोर देशाच्या संरक्षणासाठी तरूण पिढीचे कर्तव्य काय आहे. देशाप्रतीचे प्रेम व स्वाभिमान कसा वृध्दींगत करता येईल या संबंधीचे उदाहरणे देवून आपले मत व्यक्त केले.



## 5 सप्टेंबर 2015 ला शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम :–

5 सप्टेंबर 2015 ला कमला नेहरू महाविद्यालयात शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विद्यार्थी व स्वयंसेवक यांच्या मार्फत साजरा करण्यात आला. त्यांनी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना मधील समिती मध्ये असलेल्या प्राध्यापकांना निमंत्रीत करण्यात आले.

## 24 संप्टेंबर 2015 राष्ट्रीय सेवा योजना संस्थापन दिवस साजरा

कमला नेहरू महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना संस्थापन दिवस साजरा केला. हा कार्यक्रम अमर सेवा मंडळाच्या अध्यक्षा आदरणिय डॉ. श्रीमती सुहासिनी वंजारी मॅडम तसेच अमर सेवा मंडळाचे सचिव मा. ॲड. अभिजीत वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

अमर सेवा मंडळाच्या अध्यक्षा आदरणीय डॉ. श्रीमती वंजारी मॅडम यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना कशाप्रकारे झाली. देशामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची काय गरज आहे ? यासबंधी माहिती दिली. त्यांनी सांगितले की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना झाली.

## 2 आक्टोंबर 2015 महाविद्यालयामध्ये जागतिक अहिंसा दिन साजरा

कमला नेहरू महाविद्यालयामध्ये दि. 2 ऑक्टोंबर 2015 ला महात्मा गांधी जयंती या दिनानिमित्त जागतिक अहिंसा दिवस म्हणून कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचा सहभाग होता. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांच्या जीवन कार्याविषयी आपले मत मांडले. या कार्यक्रमाला अमर सेवा मंडळाच्या अध्यक्षा आदरणीय डॉ. श्रीमती सुहासिनी वंजारी या होत्या.

### 26 नोव्हेंबर 2015 संविधान दिनानिमित्त रॅलीमध्ये सहभाग :–

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने संविधान दिनाच्या निमित्ताने कमला नेहरू महाविद्यालयातील 63 विद्यार्थी हया रॅलीमध्ये सहभागी झालेले होते. सक्करदरा ते यंशवंत स्टेडीयम पर्यंत सायकल/स्कुटर/बाईक ने रॅली नेण्यात आली. त्यानंतर या संविधान दिनाच्या निमित्ताने यशवंत स्टेडीयम येथे संविधानाचे वाचन कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. देवेन्द्रजी फडणवीस उपस्थित होते. तसेच अनेक क्षेत्रातील नामवंत व्यक्ती, नागपूर शहराचे महापौर, उपमहापौर, गणमान्य व्यक्ती उपस्थित होते. मा. मुख्यमंत्र्यांनी संविधानाची शपथ घेतली आणि त्यानंतर भारतीय संविधानाचे महत्व व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान या संबंधातुन आपले विचार व्यक्त केले.

### 30 नोव्हेंबर 2015 :–

दिनांक 30 नोव्हेंबर 2015 रासेयो/120/2015–16 च्या परिपत्रकानुसार स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कार्यक्रम कमला नेहरू महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये मैदानावरील केरकचरा, गवत, दगड काढुन खड्डे भरण्यात आले. मुलांच्या व मुलींच्या सायकल स्टॅन्डवरील कचरा उचलण्यात आला.

### दि. 1 डिसेंबर 2015 जागतिक एडस् विरोधी जागृत दिन साजरा :–

अमर सेवा मंडळ द्वारा संचालित कमला नेहरू महाविद्यालयात 1 डिसेंबर 2015 ला जागतिक एडस् दिवसानिमित्त महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा परिसंवाद आयोजित घेण्यात आला. योजना विभागातील 10 विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यात प्रविण, आकाश, रोशन चाफेंकर, ज्योती कमें, इतर विद्यार्थ्यांनी महत्वपुर्ण विचार मांडले. एड्स हा संसर्गजन्य रोग नाही त्यासंबंधीची कोणती काळजी घ्यायची त्यावर प्रतिबंधक उपाय सुध्दा सांगितले.

# शिबीराचा अहवाल

अमर सेवा मंडळद्वारा संचालित कमला नेहरू महाविद्यालय, सक्करदरा चौक, नागपूर यांच्या तर्फे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर **2015–2016** या सत्राकरिता (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज) **"स्वच्छ भारत अभियान"** या विषया अंतर्गत **दि. 15 डिसेंबर ते 21 डिसेंबर 2015** या कालावधीमध्ये संजीवन वृध्दाश्रम आमगाव देवळी, ता. हिंगणा, जि. नागपूर येथे घेण्यात आले.

**मंगळवार दिनांक 15 डिसेंबर 2015 विद्यार्थ्यांचे शिबीरस्थळी आगमन :–**

या शिबीरामध्ये 50 विद्यार्थी व 50 विद्यार्थिनींचा सहभाग होता. महाविद्यालयातून दुपारी 12.00 वाजता शिबीरार्थीचे शिबारासाठी आगमन झाले. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना त्यांना राहण्याकरीता रूम देण्यात आल्या.

तसेच त्याच दिवशी उद्‌घाटन सोहळा घेण्यात आला. अमर सेवा मंडळाचे सचिव, मा. ॲड. अभिजीत वंजारी होते. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व व शिबीर घेण्याचे कारणे व फायदे यासंबंधी माहिती दिली.

**बुधवार दिनांक 16.12.2015**

यादिवशी सकाळचे कार्यक्रम हे कार्यक्रम पत्रिकेनुसार घेण्यात आले. सकाळी 10.00 वाजता संजीवन वृध्दाश्रमातील व्यक्तींशी हितगुज करण्यात आले यामध्ये सर्व शिबीरार्थीना वृध्दाश्रमाविषयी सूचना देण्यात आल्या.

दुपारी 2.00 वाजता **"पर्यावरणाचे असंतुलन एक समस्या"** या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. या व्याख्यानावर प्रा. अनिल भाईक यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी पर्यावरणाविषयी भाषण दिले. जंगलतोड, वायुप्रदुषण, जल प्रदुषण, ध्वनी प्रदुषण यासंबधीची माहिती शिबीरार्थीला दिली. वाढत्या लोकसंख्येमुळे कश्याप्रकारे पर्यावरणात बदल झाले हे त्यांनी सविस्तर सांगितले.

**गु?वार ृदनांक** 17 **ृडसे?बर** 2015

सकाळचे कार्यक्रम हे कार्यक्रम पत्रिकेनुसार घेण्यात आले. सकाळी 9.00 वाजता शिबीरार्थींना नागाझरी येथे ग्रामीण भागाला भेट देण्याकरिता नेण्यात आले. शहरी भागातील विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील राहणीमान, गावातील सुखसोयी, समस्या तसेच सामाजिक समस्या कोणत्या प्रकारच्या आहेत. हे माहिती होण्याकरिता नागाझरीला या गावाला भेट देण्यात आली.

दुपारी 12.00 वाजता नशिब आपल्या हातात या विषयावर डॉ. स्मिता आयचित यांनी व्याख्यान दिले. त्यांनी शिबीरार्थींना व्यक्तीमत्व विकासाबाबतचे महत्व स्पष्ट केले. नशिबावर अवलंबून न राहता आपले कर्तव्य आपण पार पाडले पाहिजे. त्यांनी अगदी सोप्या भाषेत हसत खेळत विषयाची मांडली केली. शिबीरार्थीला सुध्दा हा विषय मनापासून आवडला.

दुपारी 3.00 वाजता "जन संवादाची माध्यमे व कला अभिरूची" या विषयावर डॉ. बळवंत भोयर संस्थापक अध्यक्ष, रसिकराज साहित्य साहित्य संस्था, नागपूर यांनी व्याख्यान दिले. त्यांनी जनसंवादाची माध्यमे व कला अभिरूची याबाबत महत्वपुर्ण माहिती दिली.

**शु?वार ृदनांक** 18 **ृडसे?बर** 2015

सकाळचे कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम पत्रिकेनुसार घेण्यात आले. सकाळी 9.00 वाजता संजीवन वृध्दाश्रमामध्ये श्रमदान करण्यात आले. शिबीरार्थीने संजीवन वृध्दाश्रमात जावून तेथे स्वच्छता अभियान केले.

दुपारी 1.00 वाजता **"श्रमदानाचे महत्व व स्वच्छता अभियान"** या विषयावर डॉ. सुभाषजी बेलसरे माजी कुलसचिव रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी व्याख्यान दिले. श्रमदानाचे महत्व त्यांनी सांगितले.

दुपारी 3.00 वाजता **"तरूणातील हृदय विकाराची कारणे"** या विषयावर डॉ. संजय राऊत अधिष्ठाता इंदिरा गांधी मेडीकल कॉलेज नागपूर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी तरूणांमध्ये हृदय विकार कसे येतात. यासंबंधी माहिती दिली

## शनिवार दि. 19 / 12 / 2015

यादिवशी सकाळी 6.00 वाजता संजीवन वृध्दाश्रम येथे योगा प्रात्यक्षिक घेण्यात आले. हे प्रात्यक्षिक डॉ. जिवेश पंचभाई (योगतज्ञ) यांनी योगाविषयीची माहिती दिली

याचा खुप फायदा झाला. जीवनाला योगाला फार महत्वाचे स्थान आहे. कोणत्या व्याधीवर कोणते आसन करावे असे परिपूर्ण ज्ञान त्यांनी सांगितले. यामध्ये कमला नेहरू महाविद्यालयाचे प्राचार्य सुध्दा उपस्थित होते.

सकाळी 9.00 वाजता "मांडवा" गावाला भेट दिली. सर्व शिबीरार्थीने गावातील लोकांच्या भेटी घेवून गावात असणाऱ्या समस्यांचा सर्वे केला व तेथील समस्या सुध्दा जाणून घेतल्या.

दुपारी 1.00 वाजता "व्यसनमुक्ती, स्वच्छता अभियान, यासंबंधी ग्रामगीतेतील विचार" या विषयावर प्रबोधनकार डॉ. दिलीप कोसरे यांनी या विषयावर व्याख्यान दिले त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी लिहिलेल्या ग्रामगीतेवर प्रकाश टाकला

दुपारी 3.00 वाजता कमला नेहरू महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रदिप दहिकर यांनी "वृध्दाश्रमाची वाढती संख्या चिंताजनक आहे काय ?". या विषयावर माहिती दिली. त्यामध्ये त्यांनी वृध्दाश्रमाची संकल्पना, आधुनिक जगात वृध्दाश्राची गरज यासंबंधी त्यांनी आपले विचार मांडले.

## रविवार दि. 20 / 12 / 2015

सकाळचे कार्यक्रम हे कार्यक्रम पत्रिकेनुसार घेण्यात आले. सकाळी 9.00 वाजता आमगाव (देवळी) या गावाला भेट दिली. शिबीरार्थीने घरोघरी जावून गावकऱ्यांच्या भेटी घेवून तेथील समस्या जाणुन घेवून गावाचा सर्वे केला. गावातील लोकांना अंधश्रध्दा, व्यसनमुक्ती या संबंधातुन मार्गदर्शन केले.

दुपारी 12.00 व्यसनमुक्ती चळवळीमध्ये विद्यार्थ्यांची भुमिका या विषयावर प्रा. विनोद शेन्डे, संचालक नवजीवन व्यसनमुक्ती केन्द्र, नागपूर यांचे व्याख्यान झाले त्यांनी व्यसनमुक्ती

दुपारी 3.00 वाजता डॉ. वासुदेव गुरनुले यांनी जीवनात योगाचे महत्त्व या संबंधातुन मार्गदर्शन केले. त्यांनी योगाच्या बाबतीत महत्वपूर्ण माहिती दिली.

## सोमवार दि. 21 / 12 / 2016

सोमवार दिनांक 21 डिसेंबर 2015 ला सकाळचे कार्यक्रम हे कार्यक्रम पत्रिकेनुसार घेण्यात आले. तसेच यादिवशी शिबीराचा समारोपीय कार्यक्रम असल्यामुळे त्याची तयारी करण्यात आली. शिबीरार्थीकडून परिसर स्वच्छ करण्यात आला. व शिबीर समारोपीय कार्यक्रम तयारी करण्यात आली.

या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षा अमर सेवा मंडळाच्या अध्यक्षा आदरणीय डॉ. श्रीमती सुहासिनी वंजारी उपस्थित होत्या त्यांनी सांगितले की, तरूण व युवाशक्तीचा योग्य वापर देशाकरीता व्हावा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा व्यक्तीगत व सर्वांगीण विकास घडवून आणणे या उद्देशाने NSS ची स्थापना करण्यात आली.

## 13 जानेवारी 2016 शाळाबाहय विद्यार्थी सर्वेक्षण कार्यक्रम :–

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचा विभाग, नागपूर च्या वतीने 13 जानेवारी 2016 च्या परिपत्रकानुसार शाळाबाहय मुलांचे सर्वेक्षणाकरिता तालुक्यामध्ये सोबतच्या कृती आराखडयानुसार सर्वेक्षण करण्यात आले. हा कार्यक्रम शालेय शिक्षण व क्रिडा विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्या वतीने छापील प्रपत्र देण्यात आले.

## 22 जानेवारी 2016 रस्ता सुरक्षा अभियान कार्यक्रम :–

कमला नेहरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत "रस्ता सुरक्षा अभियान" या विषयावर व्याख्यान देण्याकरिता मा. श्री. रूपकुमार बेलसरे RTO ग्रामीण नागपूर विभाग यांना निमंत्रित करण्यात आलेले होते. कमला नेहरू महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यांनी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागामार्फत राबविणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. त्याचप्रमाणे त्यांनी रस्ता सुरक्षा बाबत वाहतुकीच्या बाबतीत माहिती दिली. यानंतर कमला नेहरू महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रदिप दहिकर यांनी रस्ता सुरक्षा अभियान या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की आजचा तरूण हा बाईक चालवितांना नियमांचे पालन करीत नाही. त्यामुळे अपघाताचे व मृत्युचे प्रमाण वाढत आहे.

## 23 जानेवारी 2016 प्लॅटफॉर्म ज्ञानमंदिर निवासी शाळेला भेट :–

कमला नेहरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "नागपूर महानगर पालिका नागपूर (शिक्षण विभाग), रेल्वे पोलिस नागपूर विश्व हिंदु जनकल्याण परिषद विदर्भ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने "प्लॅटफॉर्म ज्ञानमंदिर निवासी शाळेला 30 विद्यार्थ्यासह भेट देण्यात आली.

## 26 जानेवारी 2016 गणराज्य दिवस साजरा :–

महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गणराज्य दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अमर सेवा मंडळाच्या अध्यक्षा आदरणीय डॉ. श्रीमती सुहासिनी वंजारी अध्यक्षस्थानी होत्या. व संस्थेचे सचिव मा. ॲड अभिजीत वंजारी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. आदरणीय वंजारी मॅडम यांनी सांगितले की, 15 ऑगष्टला देशाला स्वातंत्र मिळाले परंतू या 26 जानेवारीला देशाने लोकशाही स्विकारली. देशातील सुव्यवस्था, शांतता, न्याय, सामाजिक दायित्व करण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक मजबूत व सशक्त संविधान दिले. त्याचे पालन करण्याकरिता देशातील नागरीकांनी व तरूण वर्गांनी अंमलात अणण्याची गरज आहे. तेव्हाच देशात शांतता व सुव्यवस्था नांदेल असे मत व्यक्त केले.

30 Jan 2016

कमला नेहरू महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक 30 जानेवारी 2016 ला हुतात्मा दिवसा निमित्त सकाळी 11.00 वाजता ज्या जागेवर असेल त्या जागेवर स्तब्ध उभे राहून हुतात्म्यांच्या श्रध्दांजली अर्पण केली व 11.30 मिनिटांनी दुसऱ्या बेलला मौन संपले.

## 2 फेब्रुवारी 2016 :–

डिव्हाईन इंडियन युथ असोसिएशन व कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने या "Workload Make it easy" विषयावर श्री. पियुष शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले

कमला नेहरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व डिव्हाईन इंडिया युथ असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम घेण्याचे ठरविले. म्हणुन Make it easy या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. यात व्यक्तीमत्व विकास कसा केला जाईल. कोणतीही बाब कठीण नाही त्याकरिता थोडे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**3 फेब्रुवारी 2016 टेमसना गाव दत्तक घेण्याकरीता प्रस्ताव :–**

कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत गाव दत्तक घेण्याबाबत विचार करण्यात आला. दिनांक 3/02/2016 ला टेमसणा गाव, ता. कामठी, जि. नागपूर यांना पत्र पाठविण्यात आले. गाव दत्तक घेण्याचे ठरविले या करीता प्राचार्यांनी मा. सरपंच ग्रामपंचायत टेमसना ता. कामठी, जि. नागपूर यांना पत्र पाठविण्यात आले. गाव दत्तक घेण्याची संकल्पना अमर सेवा मंडळाचे सचिव ॲड. अभिजीत वंजारी यांची आहे. गाव दत्तक घेवून त्या गावात शिबीर, सामाजिक कार्य, राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत राबवून समाज परिवर्तन घडवून आणणे हा मुख्य उद्देश आहे. दिनांक 4 फेब्रुवारी 2016 ला मा. सरपंच गट ग्राम पंचायत टेमसना पंचायत समिती कामठी, जि. नागपूर यांचे पत्र प्राप्त झाले. त्यांनी टेमसना गाव दत्तक घेण्याबाबत परवानगी देण्यात आली.

8 March 2016

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक 1/03/2016 रासेयो/54/2015–2016 च्या परिपत्रकेनुसार आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित सायकल रॅलीमध्ये मुली सहभागी होण्याबाबत या निमित्त्याने मंगळवार दिनांक 8 मार्च 2016 रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिलांशी संबंधित समस्या, महिला सक्षमीकरण, इत्यादी विविध उपक्रमात जनजागरण करण्याकरिता भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली मंगळवार दिनांक 8 मार्च 2016 सकाळी 7.45 वाजता तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय – एल.आय.सी चौक–मॉरीस कॉलेज चौक–लोहापुल–लक्ष्मी टॉकीज चौक–झाशी राणी चौक नंतर रॅलीचा समारोप करण्यात आला.

**Prof. Ashok I. Kamble**
Programme Officer
National Service Scheme
Kamla Nehru Mahavidyalay
NAGPUR-9

**PRINCIPAL**
Kamla Nehru Mahavidyalay
Sakkardara Chowk, Nagpur